# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

**(म्हाडाचा विभागीय घटक)**

**सर्वसामान्यांना परवडणाऱ्या सदनिकांच्या विविध योजना**

**(प्रधानमंत्री आवास योजना, २०% सर्वसमावेशक आणि म्हाडा गृहनिर्माण योजना)**

**(सोडत मार्च- २०२१)**

## माहिती पुस्तिका


**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, महावीर स्तंभाजवळ,**

**सिबीएस रोड, औरंगाबाद-४३१००१.**

**हेल्प लाईन क्रमांक : ०२४०-२३३४०३५**

**भ्रमणध्वनी : ०२४०-२३३४०३५**

**Email :emaurmhada@gmail.com**

**Website :https://www.lottery.mhada.gov.in**

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## अनुक्रमणिका


| **तपशिल** |
|---|
| लॉटरी चे वेळापत्रक |
| योजनांचा तपशिल |
| पात्रतेच्या अटी |
| अर्ज सादर करण्याची पध्दत व पात्रतेच्या अटी |
| सदनिकांच्या संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती |
| विशेष अटी व शर्ती |
| अर्जामध्ये लिहावयाचे आरक्षित गटाचे नाव व त्याचे विवरण |
| सावधानतेचा इशारा |
| प्रवर्गनिहाय / संकेत निहाय आरक्षण तक्ता |
| ऑनलाईन नोंदणी व अर्जासाठी Help File |

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## लॉटरी मार्च-२०२१ चे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणे | १८/०२/२०२१ | सकाळी १२.०० वाजता |
| २. | ऑनलाईन नोंदणीची व अर्ज करण्याची सुरूवात | १८/०२/२०२१ | दुपारी १२.०० पासून |
| ३. | ऑनलाईन अर्जासाठी नोंदणीची शेवटची तारीख व वेळ | १७/०३/२०२१ | सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ४. | सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावयाची शेवटची तारीख व वेळ | १८/०३/२०२१ | रात्री ११.५९ पर्यंत |
| ५. | ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम दिनांक | १९/०३/२०२१ | रात्री ११.५९ पर्यंत |
| ६. | बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | १९/०३/२०२१ | संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ७. | सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी | २४/०३/२०२१ | सकाळी ११.०० वा |
| ८. | सोडतीसाठी स्विकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिध्दी | २६/०३/२०२१ | सायंकाळी ११.०० वा |
| ९. | सोडत स्थळ म्हाडा कार्यालय औरंगाबाद | २७/०३/२०२१ | सकाळी १०.०० वाजता |
| १०. | सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे | २७/०३/२०२१ | सायंकाळी ६.०० वाजता |

| अ. क्र. | संकेत क्रमांक | योजनेचे नाव | सदनिकेची अंदाजित किंमत (रु.) | चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | बांधकाम क्षेत्रफळ (चौ.मी.) | एकुण सदनिका | आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) (एकूण आरक्षण ११ %) | अनुसूचित ा जमाती (S.T.) | भटक्या जमाती (N.T.) - | .विमुक्त जमाती (D.T.) - | पत्रकार | स्वातंत्र्य सैनिक | शारिरिक दृष्टया अपंग | संरक्षण दल किंवा सिमा सु ाक्षा दलातील लढाईत मृत झ ाालेल्याव्य ाक्तीचे कुटुंबीय अथवा लढाईत जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | माजी सैनिक व त्यांच्या वर अवलंबुन असलेल्या व्यक्ती | महाराष्ट्रात ील मतदारसंघ ाचे प्रतीनिधित्व ा करणारे संसदेचे विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माली सदस्य | म्हाडा कर्मचारी (ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आहे) | राज्य शासकीय कर्मचार ी मंडळ महामंडळ इ.चे कर्मचार ी (ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आह यात यसपूर्वी सेवानिवृत्त झ ाालेल्यांचा समावेश स आहे.) | शासकीय ा निवासस्थानामध्य ो राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत विंवा अगोदरच ा सेचानिवृत्त झ ाालेले आहेत असे केंद्र सरकारच ो कर्मचारी | चित्रपट दुरदर्शन नाटक तमाशा आकाशव ाणी श माध्यमात ील कलाकार तसेच परु ॉर्मिंग आर्टशी संबधित असलेले कलाकार (चित्रकारशिल्पकार गवई ावद्य नतैक कारागिर कवी कव्वाल व नकलाकार) | सर्वसाधारण ा | महारेरा नोंदणी क्रमांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| **(अ) प्रधानमंत्री आवास योजना (PMAY)** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **प्रधानमंत्री आवास योजनेच्या अटी व शर्तीस अनुसरून अर्ज पात्र झाल्यानंतर सदनिकेच्या विक्री किंमतीमधून केंद्र व राज्य शासनाचे एकुण अनुदान रू. २.५०/- लक्ष प्रति सदनिका वजा करण्यात येईल.** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **अत्यल्प उत्पन्न गट (EWS)कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादारु. २५,०००/- पर्यंत,अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ६० एकुण रु.५६०/- विनापरतावा)** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | ११३ | स.क्र.६८ पडेगाव जि.औरंगाबाद | ९९३०००० | २९.७६ | ३३.४० | ३६८ | ४० | २२ | ६ | ६ | ९ | ९ | ११ | ७ | १८ | ७ | ७ | १८ | ७ | ७ | १९४ | P५१५०००२६५३१ |
| २ | ११४ | गट क्र. १४६ अ, हिंगोली | ७६१००० | २९.५१ | ३९.११६ | १३२ | १५ | ८ | २ | २ | ३ | ३ | ४ | ३ | ७ | ३ | ३ | ७ | ३ | ३ | ६६ | P५११२०००२७५७७ |

# (ब ) २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना

**अत्यल्प उत्पन्न गट (EWS) कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादारु. २५,०००/- पर्यंत, अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ६० एकुण रु.५६०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११५ | मे.ग्राफीक इंन्फ्रास्ट्रक्चर देवळाई,औरंगाबाद | १२१५१९२ | २९.०० | ४६.०३ | ७ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६ | P५१५०००१९७९८ |

**अल्प उत्पन्न गट (LIG) कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादारु. २५,००१/- ते रु.५०,०००/- पर्यंत, अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१००००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ६० एकुण रु.५६०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ११६ | मे.ग्राफीक इंन्फ्रास्ट्रक्चर देवळाई,औरंगाबाद | १७०७५५२ - १७७५१३६ | ४२.६०-४३.१० | ६४.६८-६७.२४ | १२ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ८ | P५१५०००१९७९८ |
| ५ | ११७ | सिमर प्राईड व्हेन्चर ,शहानुरवाडी, औरंगाबाद . | १८३९८१६ | ४५.८५ | ६९.६९ | २८ | ३ | २ | ० | ० | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १३ | P५१५०००१९५५३ |
| ६ | ११८ | दिशा देवगिरी संकुल,सातारा, औरंगाबाद. | ११२५४३२-१४३४५७६ | ३७.३९-४८.६६ | ४२.६३-५४.३४ | ६० | ७ | ४ | १ | १ | १ | १ | २ | १ | ३ | १ | १ | ३ | १ | १ | ३२ | P५१५०००१७७७८ |
| ७ | ११९ | मे.सिदधांत विश्व, सातारा,औरंगाबाद. | १४२६३९२ | ३७.५८ | ५४.०३ | १६ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ११ | P५१५०००१७७१५ |
| ८ | १२० | साई हार्मोनी, देवळाई जि. औरंगाबाद (दुसरी जाहिरात) | ११८५१०० - १४९५०३२ | ३३.३४-३७.८१ | ४४.८९-५१.२८ | २३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २१ | P५१५०/००१६५०३ |
| ९ | १२१ | हरसिद्धी बिल्डर्स, हर्सुल जि. औरंगाबाद (दुसरी जाहिरात) | १३१९४७२ | ४४.९७ | ४९.९८ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | P५१५०००१७१७२ |

## (ब) म्हाडा गृहनिर्माण योजना

**अल्प उत्पन्न गट (LIG) कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा रु. २५,००१/- ते रु.५०,०००/- पर्यंत, अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१००००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ६० एकुण रु.५६०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | १२२ | गट क्र. १४६ अ, हिंगोली | ११००००० | ४२.४० | ५६.५१ | ४८ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २६ | P५११२०००२७५७७ |

**मध्यम उत्पन्न गट (MIG ) कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादारु. ५०,००१/ ते रु.७५०००/-- पर्यंत,अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम रु.१५०००/-(अर्जाची किंमत रु.५०० + GST ६० एकुण रु.५६०/- विनापरतावा)**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२३ | १६८ सदनिका, पडेगाव जि. औरंगाबाद | १७९०००० | ५९.७६ | ६४.५१ | १६८ | १८ | १० | ३ | ३ | ४ | ४ | ५ | ३ | ८ | ३ | ३ | ८ | ३ | ३ | ९० | P५१५०००१९७९८ |

## ३. पात्रतेच्या अटी

- **ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपुर्वक वाचावी.**

औरंगाबाद मंडळातील सदनिकांच्या विक्रीसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम-१९८१ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम-१९८१ यामधील तरतुदी अनुसार व त्या त्या वेळी, अवस्थप्रत लागू केल्या जाणाऱ्या तरतूदीच्या अधीन राहून इच्छुक अर्जदारांकडून या सदनिकांच्या विक्री करिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३.१ अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.**

**३.२ अर्जदार किंवा त्याची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून अर्ज करीत असलेल्या योजनेच्या मनपा / नपा हद्दीत गाळा / घर किंवा निवासी भुखंड नसावा.**

**३.३** जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्रातील मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराचे किमान १५ वर्षाचे वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) / रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (केंद्र शासन कर्मचारी (CG) प्रवर्ग - आरक्षण वगळून)

३.४ **अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न विविध उत्पन्न गटासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे असावे.** "कौटुंबिक मासिक उत्पन्न" म्हणजे अर्जदाराचे स्वतःचे एकटयाचे व त्यांची पत्नी / पती यांची मासिक प्राप्ती असल्यास दोघांचे मिळून नोकरीद्वारे अथवा उद्योगधंद्यापासून, जीवितार्थाचे सर्वसाधारण साधन दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीत झालेल्या प्राप्तीवरून परिगणीत करण्यात यावे. उत्पन्न या संज्ञेत पगार, मूळ वेतन, महागाई भत्ता, शहर भत्ता, बोनस इ. भत्ते यांचा समावेश राहील. तथापि घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, धुलाई भत्ता, अतिकालिक भत्ता, किट भत्ता, वाहन भत्ता इत्यादी भत्ते जे प्रतीपुर्तीसाठी (Reimbursable Allowance) देण्यात येतात त्यांचा समावेश असणार नाही.

**अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न गटनिहाय खालीलप्रमाणे असणे आवश्यक राहील.**

| उत्पन्न गट | कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा |
|---|---|
| अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | रु. २५,०००/- पर्यंत |
| अल्प उत्पन्न गट (LIG) | रु. २५,००१ ते रु. ५०,०००/- पर्यंत |
| मध्यम उत्पन्न गट (MIG) | रु.५०,००१ ते रु. ७५,०००/- पर्यंत |

३.५ द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेलफेअर फॉर पर्सन्स विथ ऑटिस्म, सिरब्रेल पालसी, मेंन्टल रिटार्डेशन ॲण्ड डिसॅबिलिटिज, ॲक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतूदींच्या अधिन राहून मतीमंद (Mentaly Retarded) व मनोविकृत (Mental Illness) अर्जदारांच्या वतीने संबंधित व्यक्ती / संस्था अर्ज करु शकतील व स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्ती सदनिकेचे वितरण करताना त्याचे स्वत: पालकत्व असलेल्या व्यक्तीचे / संस्थेचे उत्पन्न विचारात घेण्यात येईल.

**४. वितरणासाठी सदनिकांची उपलब्धता :-**

उपलब्ध असलेल्या सदनिका / गाळा / निवासी भूखंडाचा तपशील नमूद केलेला आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मधील नियम १३ च्या तदतुदीनुसार जाहीर करण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनेतील सदनिकांचे आरक्षण ठेवण्यात येते.

**-: सोडत मार्च-२०२१ साठी अर्ज भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे :-**

४.१ म्हाडा लॉटरी संकेत स्थळावरील **https://www.lottery.mhada.gov.in**

येथे अर्जदाराने सर्व प्रथम स्वत:ची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी. **नोंदणी करण्याच्या कालावधी दिनांक १८/०२ /२०२१ ते १७/०३ /२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** संपेल याची कृपया नोंद घ्यावी. (अर्ज करण्यासाठीची सविस्तर माहिती Help File मध्ये दिलेली आहे.)

४.२ नाव नोंदणीसाठी अर्जदाराने अर्जामध्ये विहीत केलेली माहिती अर्जदाराने भरणे आवश्यक आहे तसेच * **अशी खुण** असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे. अशी बंधनकारक माहिती व ड्रॉप डाऊन मधील माहिती फक्त इंग्रजीमध्ये उपलबध राहील.

४.३ **अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपुर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, म्हणजे अर्ज भरणे सुलभ जाईल.**

१. नाव

२. उत्पन्न गट

३. आरक्षण प्रवर्ग

४. अर्जदार सध्या राहात असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिन कोड क्रमांक.

५. अर्जदाराची जन्मतारीख (पॅनकार्ड प्रमाणे)

६. पॅनकार्ड

७. आधार क्रमांक (UID No.)

८. अर्जदाराच्या बॅंक खात्याचा तपशिल

अर्जदाराच्या स्वतःच्या बचत खात्याचा तपशिल जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा IFSC क्रमांक द्यावा. SBH / SBT / SBM / SMP भारतीय महिला बँक या आणि अशा अन्य बँका ज्या दुसऱ्या मुख्य बँकेत विलिन झाले आहेत अशा बँकेतील खातेदारांनी योग्य त्या बँकेचा IFSC कोड नंबर देण्याची काळजी घ्यावी. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येतील. तसेच चालु खाते, संयुक्तीक खाते एन.आर.आय. खात्याचा तपशिल चालणार नाही.

९. अर्जदाराचा स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आय.डी. देणे बंधनकारक आहे.

१०. अर्जदार तसेच त्याचे पती / पत्नी यांचे दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीतील सरासरी मासिक उत्पन्न.

११. अर्जदाराने अर्जामध्ये त्याचा स्वतःचा PAN NO देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुसऱ्याचा पॅन कार्ड नंबर दिल्याचे आढळल्यास असे अर्ज चुकीची माहिती दिल्यामुळे कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील. पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरिफिकेशन केले जाईल.

१२. अर्जदाराने स्वतःचे स्कॅन केलेले **५० kb पर्यंत jpg format** मध्ये असलेले ठळक व सुस्पष्ट असलेले छायाचित्र तयार ठेवावे. (ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतेवेळी स्वतःचा फोटो अपलोड करावा.)

४.४ ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जदाराला त्या अकाऊंटद्वारे वेगवेगळया संकेतात अथवा एकाच संकेतातील वेगवेगळया प्रवर्गात एका पेक्षा जास्त अर्ज भरता येतील. नोंदणी **दि.१८/०२/२०२१ रोजी सुरू होऊन दि. १७/०३/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलबध राहील.**

४.५ अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर User Name व पासवर्ड चा वापर करुन सदर अकाऊंट operate करता येईल. सर्व communication हे e-mail व SMS द्वारे करण्यात येणार असल्यामुळे email ID व Mobile No भरताना काळजी घेणे आवश्यक आहे.

४.६ **ऑनलाईन अर्ज करणे : ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि. १८/०३/२०२१ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत राहील. अर्ज करताना आपण ज्या उत्पन्न गटाकरिता / प्रवर्गाकरिता पात्र असाल त्या उत्पन्न गटाकरिता असलेल्या संकेताकरिता व प्रवर्गाकरिता अर्ज करावा.** (अर्ज करण्यासाठीची सविस्तर माहिती Help File मध्ये दिलेली आहे.) **त्यानंतर अर्जदाराने प्रिंटेड रिसिट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. प्रिंटेड रिसिट वर अर्ज क्रमांकाबरोबर दहा अंकी क्रमांक दर्शविला जाईल. हाच क्रमांक सोडतीसाठी विचारात घेतला जाणार आहे.**

४.७ **त्यानंतर अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी Payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम बाबतची प्रक्रिया पुर्ण करावी. (अनामत रक्कमेचे payment करण्यासाठीचे पध्दतीची सविस्तर माहिती Help File यासोबत परिशिष्ठ १ मध्ये दिलेली आहे.) ऑनलाईन पेमेंट स्विकृती दि. १९ /०३/२०२१ रात्री ११.५९ पर्यंत राहील. RTGS / NEFT** द्वारे करावयाची असल्यास दि. १९/०३/२०२१ पर्यंत अर्जदाराच्या स्वतःच्या संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेनुसार जमा करता येईल.

४.८ जे अर्जदार ऑनलाईन पेमेंट करणार आहेत त्या अर्जदारांनी **अर्जाची प्रिंट घेतल्यानंतर किंवा जतन केल्यानंतर अर्जदाराने MY APPLICATION मध्ये जाऊन पेमेंट करावे.**

४.९ अर्जदारास त्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये अनामत रक्कमेचा भरणा करण्यापुर्वी अर्ज दाखल करावयाच्या अंतिम तारखेच्या वेळेपुर्वी बदल करता येईल. अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल.

४.१० अर्जदारास सोडतीपुर्वी अनामत रक्कम भरुन बँकेकडे सादर केलेला अर्ज कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपुर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने Credit Card द्वारे अनामत रक्कम भरल्यावर सदर अनामत रक्कम म्हाडाच्या खात्यावर जमा झाल्याची खात्री करणे ही अर्जदाराची जबाबदारी राहील.

४.११ अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानुसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करु शकेल. तथापि एकापेक्षा जास्त पात्र योजना संकेतासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक संकेत क्रमांकासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरावा लागेल. जर अर्जदार एकापेक्षा जास्त योजना संकेत क्रमांकामध्ये सोडतीत यशस्वी झाला, तरी त्याला त्याच्या पंसतीच्या कुठल्याही एकाच योजना संकेतासाठी कागदपत्रे व प्रशासकीय शुल्क जमा करता येईल. त्याचवेळी त्याचा इतर योजना संकेतामधील सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

४.१२ अर्जदार योजना संकेतामधील ज्या प्रवर्गामध्ये अर्ज करण्यास पात्र आहे अशा सर्व पात्र आरक्षण प्रवर्गातील सदनिकांकरिता अर्ज करु शकतो. प्रत्येक योजनेतील व पात्र प्रवर्गातील सदनिकेकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत रक्कम व अर्जाची फी भरावी लागेल. **मात्र एका योजना संकेतामधील एका प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत. तसेच एका पेक्षा जास्त उत्पन्न गटामध्ये अर्ज करता येणार नाहीत.** एकाच संकेतामध्ये व एकाच प्रवर्गात अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे त्या प्रवर्गातील असे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील.

वरील अटी व्यतिरिक्त सदर योजनेतील सदनिकांसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम-१९८१ च्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपुर्णपणे (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणासह) लागू राहतील.

**५.सदनिकांच्या संगणीकृत सोडतीची कार्यपध्दती :-**

५.१ जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑन लाईनअर्जाची प्रथम पडताळणी करण्यात येईल. यांत अर्ज विहीत अनामत रकमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल. अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केली जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधून बाद करण्यात येतील.

१. एकाच अर्जदाराचे एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.

२. एकाच अर्जदाराचे वेगवेगळया उत्पन्न गटामध्ये केलेले अर्ज.

३. वेगवेगळया अर्जदाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक

४. चूकीचा PAN क्रमांक आढळलेले अर्ज.

५. विहीत मुदतीमध्ये अनामत रक्कम जमा झाले नाहीत असे अर्ज.

६. ऑनलाईन अर्ज चालू होण्यापुर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज ऑनलाईन अर्ज चालू होण्याची व बंद होण्याची वेळ ही server मध्ये असलेली वेळ ग्राहय धरण्यात येईल.

५.२ सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकाची आरक्षण निहाय प्रारुप यादी म्हाडाच्या **https://www.lottery.mhada.gov.in** अधिकृत संकेत स्थळावर **दि. २४/०३/२०२१ रोजी सकाळी ११.००** वाजता प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेत स्थळावर माहिती प्रसिध्द झाल्यापासुन २४ तासात या कार्यालयाकडे निवेदन सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तथापि अर्जदाराने अर्जामध्ये लिहिलेल्या माहितीमध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन **सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांनी अंतिम यादी दि. २६/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

५.३ संगणकीय सोडत काढताना अर्जदाराच्या अर्जाचा क्रमांक हाच लॉटरी जनरेशन क्रमांक म्हणून गृहित धरण्यात येईल. सोडतीच्या निकालात त्यांनी त्यांच्या अर्जाचा क्रमांक तपासावा. सोडतीत यशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जांचे क्रमांक म्हाडाच्या **www.mhada.maharashtra.gov.in** **व** **https://www.lottery.mhada.gov.in** या संकेत स्थळावर तसेच म्हाडाच्या नोटीस बोर्डवर सोडत झाल्यावर तात्काळ प्रसिध्द करण्यात येतील. सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना लेखी पत्र

व्यवहार केला जाईल.

५.४ प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे संकेत क्रमांक निहाय व आरक्षण प्रवर्ग क्रमांक निहाय जाहिर सोडत संगणकाद्वारे काढण्यात येईल. संकेत क्रमांक निहाय व प्रवर्ग निहाय अर्जांची संख्या जास्त असल्यास प्रत्येक योजना संकेत क्रमांक प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्येएवढी यशस्वी यादी व संख्येच्या दोन पटीत प्रतिक्षा यादीसाठी सोडत काढण्यात येईल. मात्र प्रत्येक प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्येपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तरी उपलब्ध सदनिकांच्या वितरणासाठी प्राधान्य क्रमांक ठरविण्यासाठी सोडत काढण्यात येईल. सोडतीत यशस्वी ठरणाऱ्या अर्जदारांची यादी ही यशस्वी लाभार्थ्यांची यादी म्हणून समजण्यात येईल. यशस्वी लाभार्थांच्या यादीतील अर्जदारांची पात्रता निश्चित करण्याकरीता अर्जदारांना अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ कागदोपत्री पुरावा ३० दिवसात सादर करणे आवश्यक राहिल. पात्रतेसाठी कागदपत्रांमध्ये अधिवास प्रमाणपत्र व जातीचा दाखला तसेच जात वैधता प्रमाणपत्र (Domicile Certificate & Caste Validity Certificate) मिळण्यास उशिर लागतो असा अनुभव आहे. त्यामुळे अर्जदारांनी या प्रमाणपत्रासाठी आधिच योग्य प्राधिकाऱ्याकडे अर्ज करावेत.

५.५ यशस्वी अर्जदाराने सादर करावयाच्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे अर्जात नमूद केलेल्या माहितीबाबत सविस्तरपणे छाननी करण्यात येऊन अर्जदाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. प्राथमिक छाननीमध्ये अर्जदाराने काही कागदपत्रे अपूर्ण असल्यास तसे अर्जदारास कळविण्यात येईल व अर्जदारास प्राधिकृत अधिकाऱ्समोर आपली बाजू अपात्र ठरल्यानंतर २४ तासात मांडता येईल. जे अर्जदार पात्र ठरतील त्यांना सोडतीच्या अग्रक्रमानुसार व म्हाडा विनियम १९८१ च्या नियम १३ (१) नुसार सदनिकेच्या वाटपाचे **प्राथमिक देकार पत्र टपाला द्वारे देण्यात येईल.**

५.६ सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) अर्ज शुल्क वगळून, Electronic Clearing System (E.C.S) / NEFT द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यात पाठविण्यात येणार असल्यामुळे अर्जदाराने त्यांच्या अर्जात त्याच्या बँकेचे नाव, शाखेचा पत्ता, बँक खाते क्रमांक व IFSC क्रमांक अचूकपणे नमूद करावा. ज्या अर्जदाराची Debit / Credit Card द्वारे अनामत रक्कम जमा

केली आहे. अशा अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावरच परत करण्यात येईल.

६. **<u>संगणकीय सोडतीत यशस्वी झाल्यानंतर अर्जदाराने कार्यालयात दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील :-</u>**

सोडतीत यशस्वी अर्जदारांना पत्राद्वारे प्रथमसूचना पत्र (First Intimation Letter) पाठविण्यात येतील. सदर सूचना पत्राच्या अनुषंगाने सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना खालीलप्रमाणे कागदपत्रे पात्रता निश्चित करण्यासाठी ३० दिवसाच्या कालावधीत कार्यालयात सादर करावी लागतील.

६.१ अर्जदारांने आपले वय अर्ज सादर केल्याच्या दिनांका रोजी १८ वर्षापेक्षा जास्त होते हे सिध्द करण्यासाठीचा पुरावा सादर करावा.

६.२ अर्जदाराने जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराचे किमान १५ वर्ष सलग वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्रातील अधिवासांचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा स्थानिक वास्तव्याचा दाखला सादर करावा (केंद्र शासन (CG) प्रवर्ग वगळून)

६.३ अर्जदाराचे दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीतील १२ महिन्यांचे सरासरी मासिक कौटूंबिक उत्पन्न (ज्यात फक्त स्वतः अथवा पती व पत्नी यांच्या उत्पन्नाचा समावेश असेल) सिध्द करणारे प्रमाणपत्र जसे,

अ. अर्जदार शेतकरी असल्यास संबंधित तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला.

ब. अर्जदार नोकरी करीत असल्यास विहीत नमुन्यामध्ये नियोक्ताने दिलेले वेतन प्रमाणपत्र.

क. अर्जदार आयकर दाता असल्यास आयकर विवरण पत्राची प्रत जोडावी.

ड. अत्यल्प उद्योग, व्यवसाय, अन्य उत्पन्नाचे साधन असल्यासविहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र. (अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी)

इ. अर्जदाराच्या पती/पत्नीचे वेतन प्रमाणपत्र / आयकर विवरण पत्र / प्रतिज्ञापत्र.

फ. मध्यम उत्पन्न गटातील अर्जदाराने आयकर विवरण पत्राची प्रत जोडावे किंवा कौटूंबिक उत्पन्नाचा पुरावा सादर करवा.

६.४ अर्जदार किंवा त्याची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत म्हाडाने वितरीत केलेला व खाजगीरित्या संपादित केलेला निवासी सदनिका / निवासी भूखंड नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

६.५ राज्यातील एखादी व्यक्ती किंवा त्याचे किंवा तिचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती , राज्यातील कोणत्याही भागात महाराष्ट्र शासनाच्या किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत त्याला मालकी तत्वावर वाटप झालेले / वितरीत झालेले घर / सदनिका धारण करत असेल तर यापुढे, अशा व्यक्तीस किंवा त्याच्या / तिच्या कुटुंबियांना राज्यामध्ये कोठेही राज्य शासनाच्या / शासन अधिनस्त प्राधिकरण / स्थानिक संस्थेच्या, त्या किंवा अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेत शासकीय योजनेतील दुसरे घर / सदनिका, वाटप / वितरण सदर शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने करण्यात येईल.

**(वाचावे :- शासन निर्णय क्र. याचिका-२०१९ / प्र.क्र. ६६ / गृनिप दि. ११ सप्टेबर, २०१९)**

६.६ अर्जदारांने जाहिरातीत नमूद ज्या आरक्षीत प्रवर्गातून अर्ज केला असल्यास त्या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे कागदपत्रे, जात वैधता प्रमाणपत्रासहीत सादर करणे अनिवार्य आहे.

६.७ अर्जदाराने मागासवर्गीय प्रवर्गामध्ये अर्ज केला असल्यास त्या प्रवर्गात असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिलेले जातीचे प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती (SC),अनुसूचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमूक्त जमाती (DT) या प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांना सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) प्रथम सूचना पत्र मिळाल्यापासून ३ महिन्यात सादर करणे अनिवार्य राहिल. सदर जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिकांचा ताबा देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अशा प्रवर्गातील अर्जदारांनी पात्र ठरल्यानंतर व तसे कळविल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करावे.

६.८ अर्जदार छाननी अंती अपात्र आढळल्यास नियमानुसार प्रशासकीय शुल्क कपात करुन रक्कम परत

करण्यात येईल.

६.९ पात्रतेसाठी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी/प्रतिज्ञापत्रे इत्यादींचे चे नमुने या कार्यालयाच्या पत्रा सोबत पाठविण्यात येतील.

६.१० यशस्वी लाभार्थीच्या यादीतील जे अर्जदार सविस्तर छाननी अंती अपात्र ठरतील त्यांना त्यांच्या अपात्रतेबाबतची कारण स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल व त्या निर्णयाविरुध्द त्यांना अपिल अधिकाऱ्यांकडे ५ दिवसाचे आत अभिवेदन / अपिल सादर करण्याचा हक्क राहिल. अपिल अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहिल.

६.११ यशस्वी लाभार्थीच्या यादीवरील जे अर्जदार सदनिकेच्या वाटपासाठी अपात्र ठरतील, त्यांच्या जागी प्राधान्य क्रमानुसार प्रतिक्षा यादीवरील अर्जदारची पात्रता निश्चित करण्यात येईल छाननीत जे अर्जदार अपात्र ठरतील त्यांना वरील प्रमाणे त्यांच्या अपात्रतेबाबतच्या निर्णयाविरुध्द अपिल अधिकाऱ्यांकडे अभिवेदन करण्याचा हक्क राहिल.

६.१२ अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केल्यापासून सोडतीपर्यंतची माहिती त्यानी दिलेल्या अर्जातील पत्त्यावर स्वतंत्र पत्राद्वारे पाठविण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने पत्रव्यवहाराचा पत्ता अचूक नमुद करावा. **अर्जदाराने अर्ज भरताना दिलेला पत्ता , मोबाईल क्रमांक व ई-मेल बदलू नये.**

६.१३ **सदरच्या कालावधीत मोबाईलमध्ये Do Not Distrub (DND) ही सेवा कार्यरत नसल्याची अर्जदारांने दक्षता घ्यावी.**

**७. <u>सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>**

अ. योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहिल.

ब. **सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी देकार देण्यापूर्वी अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेल्या अनामत रक्कमेतून रु.१०००/- व देकारपत्र दिल्यानंतर अर्ज मागे घेतल्यास सदनिकेच्या रक्कमेच्या १ % इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करुन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.**

क. अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेताकांत अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात / एकाच संकेतांकात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / संकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असून तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. व त्या योजना संकेतामधील सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

ड. या माहिती पुस्तिकेत दिलेला तपशिल फक्त दिशा निर्देशक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थीना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थीना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१ / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास ( जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

इ. **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विषयक विनियम १९८१ मधील तरतुदीनुसार मंडळाच्या भूखंड / सदनिकेची ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. भूखंड / सदनिकेची अनाधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिका धारकाविरुध्द प्रचलित नियमानुसार कायेदशीर कारवाई केली जाईल.**

फ. **यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची फेर तपासणी करण्याचे अधिकार मुख्य अधिकारी यांना असून सदरहू अर्जावर म्हाडा विनियम १८ अन्वये कार्यवाही करुन त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांचे वितरण रद्द करण्यात येईल. त्यावर अर्जदारास पंधरा दिवसाच्या आत मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा यांचेकडे अपिल करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.**

ग. शासनाच्या सुधारीत धोरणानुसार सदनिकेच्या किंमतीवर लागणारा सेवा कर, (GST) अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर गाळेधारकांना भरावे लागतील.

## ८. विशेष अटी व शर्ती :-

**अ) <u>प्रधान मंत्री आवास योजना</u>**

**(कोड क्रमांक -११३ व ११४)**

१) अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

२) अर्जदाराचे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नाव नोंदणी असणे आवश्यक आहे. यापुर्वी नोंदणी केलेली नसल्यास सोडतीमध्ये यशस्वी झाल्यानंतर नोंदणी करणे बंधनकारक राहील. नोंदणी नसल्यास अर्जदारांकडून एक महिन्याच्या आत महानगरपालीकेकडे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत **घटक क्र. ३** मध्ये नोंदणी करून घेण्याचे हमीपत्र घेऊन अर्ज भरणा करून घेण्यात येईल. महानगरपालीकेकडे घटक क्र. ३ मध्ये नोंदणी करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील. घटक क्र. ३ मध्ये विहीत कालावधीमध्ये नोंदणी न झाल्यास अर्जदाराचा सदनिका घेण्याचा हक्क राहणार नाही.

३) प्रधानमंत्री आवास योजनेच्या निकषानुसार पात्र होणारे यशस्वी लाभार्थीच शासकीय अनुदानास पात्र ठरतील. तसेच ज्या लाभार्थ्यास अनुदानाचा लाभ मिळेल त्या लाभार्थ्यानांच सदनिका मिळेल. ज्या लाभार्थ्यास प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानाचा लाभ मिळणार नाही अशा लाभार्थ्यांना सदनिकेचे वाटप करता येणार नाही. मंडळाकडे भरणा केलेली रक्कम विनाव्याज परत मिळेल.

४) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाथार्थ्यांना महाराष्ट्र शासनाने मुद्रांक शुल्कात सवलत जाहिर केली असून, योजनेतील पात्र लाभार्थ्यांना फक्त रु. १०००/- मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरावी लागेल.

५) सदर योजना अग्रीम अंशदान तत्वावर राबविण्यात येत असल्याने पात्र लाभार्थ्यांना सदनिकांची विक्री किंमत बांधकामाच्या प्रगतीपथानुसार मंडळाने निर्धारित केलेल्या हप्त्यानुसार विहित कालावधीत भरावी लागणार आहे. विहीत मुदतीत हप्त्याची रक्कम न भरल्यास म्हाडाच्या नियमानुसार विलंब आकार आकारण्यात येईल.

६) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग, दि. १८/०८/२०१६ अन्वये पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांची पुनर्विक्री, सदनिकेचा ताबा मिळाल्यापासून १० वर्ष करता येणार नाही.

७) यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहीत असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्याची पत्नी या दोघांच्या नावे देण्यात येईल.

८) महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मलःनिस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस / सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

९) यशस्वी लाभार्थ्यांनी सदर योजनेत स्थापन होणाऱ्या गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

१०) विकास नियंत्रण नियमावलीनुसार जाहिरातीत नमुद केलेली किंमत सदनिकेची मूळ विक्री किंमत असून लाभार्थ्यांना एम.एस.ई.बी. चार्जेस, जी.एस.टी व इतर कर मूळ किंमती व्यतिरिक्त अदा करावी लागेल.

## ब) <u>२०% सर्वसमावेशक योजना</u>

१. सदनिकेचा ताबा देणे व अनुषंगिक बाबी विकासकांकडून करण्यात येतील.

२. विकास नियंत्रण नियमावलीनुसार जाहिरातीत नमुद केलेली किंमत सदनिकेची मूळ विक्री किंमत असून लाभार्थ्यांना सोसायटी चार्जेस, एम.एस.ई.बी. चार्जेस, जी.एस.टी, नियमानूसार मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क व इतर टॅक्सेस इ. मूळ किंमती व्यतिरिक्त विकासकास अदा करावी लागेल.

३. सदर प्रकल्पामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार समाईक पार्किंग उपलबध असून या व्यतिरिक्त स्वमालकीचे कव्हर्ड पार्किंग (उपलब्धतेनुसार) हवे असल्यास विकासकाकडे संपर्क साधावा लागेल.

४. यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहीत असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबा पत्र अर्जदार व त्याची पत्नी या दोघांच्या नावे देण्यात येईल.

५. सदर प्रकल्पाची विकासकामार्फत महारेरा कायद्याअंतर्गत झालेल्या नोंदणीनुसार लाभार्थ्यांनी टप्पेनिहाय रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील.

६.महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थीस / सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

७. यशस्वी लाभार्थ्यांनी विकासकाकडून स्थापन होणाऱ्या गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

८. सदर योजनांचे बांधकाम हे खाजगी विकासकामार्फत करण्यात येत आहे. बांधकामाचा दर्जा व नियोजनाबाबत, देखभाल सोयी सुविधा इ. बद्दल विकासक जबाबदार राहील, तसेच योजनेमधील बाह्य सुविधांचे काम विकासकाने करावयाचे आहे.

९. सदर योजनेतील सदनिका या एकात्मिकृत / विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आले आहे. **सदर शासन निर्णयानुसार म्हाडामार्फत फक्त पात्र लाभार्थ्यांची यादी विकासकास द्यावयाची आहे.**

१०. **सदर विक्री किंमतीमध्ये १० % रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून अंर्तभाव आहे, सदर रक्कम पात्र लाभार्थ्यांनी म्हाडाकडे पहिला हप्ता म्हणून भरणा करावयाची आहे** व उर्वरीत रक्कमेचा भरणा पात्रते अंती विकासकाकडे भरावयाचा आहे.

## ९. अर्जामध्ये लिहावयाचे आरक्षित गटाचे नाव व त्याचे विवरण :

| आरक्षित गटाचे नाव | आरक्षित गटाचे विवरण |
|---|---|
| **अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) (एकूण आरक्षण ११ %)** | अनुसूचित जाती (SC) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्यांना अनुसूचित जाती समजण्यात आले आहे अशा जाती वंश किंवा जमाती यामधील त्यांचा भाग किंवा गट असा आहे. |
| **अनुसूचित जमाती (ST) (एकूण आरक्षण ६ %)** | अनुसूचित जमाती (ST) याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही भागात वास्तव्य करुन राहणाऱ्या ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येते अशा जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **भटक्या जमाती (NT) (एकूण आरक्षण १.५ %)** | " भटक्या जमाती "(NT) याचा अर्थ शासनाने तशी मान्यता दिलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **विमूक्त जमाती (DT) (एकूण आरक्षण १.५ %)** | " विमुक्त जमाती "(DT) याचा अर्थ शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. |
| **पत्रकार (JR) (एकूण आरक्षण २.५ %)** | पत्रकार या प्रवर्गामध्ये जे अर्जदार पत्रकारीतेच्या व्यवसायावर अवलंबून आहेत असे व्यक्ती याकरिता **महासंचालक, माहिती व जनसंपर्क (DGIPR) यांनी दिलेले प्रमाणपत्र व पत्रकार म्हणून त्याला देण्यात आलेले ओळखपत्राची प्रमाणित छायांकित प्रत आवश्यक आहे.**<br>१. या गटातील अर्जदार व्यक्ती वर्तमान पत्राच्या आस्थापनेवरील अथवा वर्तमान पत्राशी संबधित असावेत. संपदाक, रिडर, रायटर, वृत्त संपादक, वृत्त लेखक, कॉपी पेस्टर, वार्ताहर, व्यंगचित्रकार, वृत्त छायाचित्रकार, मुद्रित तपासणीस यांचा तसेच जी व्यक्ती नियमितपणे प्रख्यात साप्ताहिक, मासिक वा पिरिऑडिकल मधील मुक्त पत्रकार यांचा या गटामध्ये समावेश होतो. तथापि खालील व्यक्तींचा पत्रकार या गटामध्ये समावेश होत नाही.<br>अ. वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासन विभागतील कर्मचारी.<br>ब. पर्यवेक्षक म्हणून काम करणाने कर्मचारी ज्यांची सेवा वृत्तपत्र कार्यालयाशी संबधित आहे अथवा ज्या कारणासाठी व्यवस्थापन स्वरुपाचे काम करणारे कर्मचारी. |
| **स्वातंत्र्य सैनिक (FF)** | " स्वातंत्र्य सैनिक " याचा अर्थ, महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकारकडून मान्य झालेले स्वातंत्र्य सैनिकांसाठी मंजूर झालेली निवृत्त |

| | |
|---|---|
| **(एकूण आरक्षण २.५ %)** | वेतन मिळणारी व्यक्ती किंवा भारताच्या स्वातंत्र्य मुक्तीच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये सहभाग असल्याबद्दलचे ताम्रपत्र/सन्मानपत्र बहाल करण्यात आलेली व्यक्ती, किंवा त्यांचे वारसदार (Next-of-kin) स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असणारी व्यक्ती जसे विधवा वा विधूर साथीदार, वडील/आई, मुलगा, नातू, मूलाची पत्नी, नातवाची पत्नी, यापुर्वी मृत्यू पावलेल्या मुलाची/नातवाची विधवा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे संबंधित प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल. स्वातंत्र्य सैनिक वा त्यांचे पश्चात वरीलप्रमाणे त्यांचे कुटूंबातील घटक व्यक्ती मिळून एकाहून अधिक सदनिका / भूखंडाचा लाभ मिळणार नाही. |
| **शारिरीक दृष्टया अपंग व्यक्ती (PH)**<br>**(एकूण आरक्षण ३ %)** | १) दृष्टीदोष (अंधत्व), २)कर्णबधीरता ३) शारिरीक दिव्यांगता, ४) मानसिक आजार, ५) बौध्दीक दिव्यांगता (Intellectual Disability), ६) बहुदिव्यांगता (Multiple Disability), ७) शारिरीक वाढ खुंटणे (डॉर्फिसम), ८) स्वमग्नता (ऑटिझम), ९) मेंदुचा पक्षाघात (सेलब्रल पाल्सी), १०) स्नायुंची विकृती (मस्क्युलर डिस्ट्राफी), ११) मज्जासंस्थेचे जुने आजार (क्रॉनिक न्युरॉलॉजिकल कंडिशन), १२) अध्ययन अक्षमता (लर्निग डिसॲबिलिटी), १३) मल्टीपल स्क्लेरॉसिस, १४) वाचा व भाषा दोष(स्पीच ॲन्ड लँग्वेज डिसॲबिलिटी), १५)थॅलेसेमिया, १६) हिमोफिलिया, १७) सिकल सेल डिसीज, १८) ॲसीड ॲटॅक व्हिक्टीम, १९) पार्किनसन्स डिसीज, २०) दृष्टीक्षीणता (लो-व्हिजन), २१) कुष्ठरोग (लेप्रसी क्युअर्ड पर्सन्स)<br><br>**जिल्हा शिल्यचिकित्सकांचे प्रमाणपत्र किंवा संबंधित वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक** |
| **संरक्षण आणि सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्यांचे कुटूंबिय अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी (DF)**<br>**(एकूण आरक्षण २ %)** | अ. या प्रवर्गात संरक्षण दलातील जे कर्मचारी किंवा सीमा भागातील रस्ते बांधणी व विकास मंडळाचे जे कर्मचारी युध्दात जखमी होऊन विकलांग झाले आहेत असे कर्मचारी आणि जे युध्दात मारले गेले असतील किंवा जे बेपत्ता असल्याचे घोषित केले असतील अशा व्यक्तींचे कुटूंबिय अर्ज करुन शकतात. यासंबंधिचे आवश्यक ते प्रमाणपत्र संबंधित संरक्षण प्राधिकाऱ्यांकडून मिळवावे लागेल. "कुटूंब" संज्ञेत विवाहसाथी, मुले आणि अविवाहीत मुली यांचा अंतर्भाव होतो.<br>ब. या प्रवर्गात पुरेसे अर्ज आले नाहीत तर या प्रवर्गातील आवश्यक ती गरज भागून ज्या सदनिका शिल्लक राहतील त्या सदनिका माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचेसाठी वर्ग करण्यात येतील. |
| **माजी सैनिक व त्यांचावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (Ex-serviceman) :** | अ. माजी सैनिक याचा अर्थ संघ राज्याच्या सशस्त्र दलातील माजी सदस्य असा आहे. (ज्या व्यक्तीच्या संबंधात सेवा न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर किंवा वाईट चारित्र्यामूळे किंवा दलातून तो निघून |

| | |
|---|---|
| **(एकूण आरक्षण ५ %)** | गेल्याच्या परिणामी ज्याला काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्याला अटक केल्याच्या कारणासतव दलातून काढून टाकण्यात आले आहे अशा माजी सैनिकांचा समावेश या प्रवर्गात होणार नाही. )<br>ब. माजी सैनिकांवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचा अर्थ विवाह साथीदार, मुलगे, अविवाहीत मुली, आई , वडील असा आहे.<br>क. संबधित संरक्षण प्राधिकरण व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून आवश्यक ती प्रमाणपत्र मिळवावी लागतील.<br>ड. माजी सैनिक वा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील घटक व्यक्ती यांना एकाहून अधिक सदनिकेचा / भूखंडाचा लाभ मिळणार नाही. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ सर्वसाधारण राखीव अभियांत्रिकी सेनेतील कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय व त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्ती योग्य फेरफारसह घेऊ शकतील. |
| **महाराष्ट्रातील राज्यातील मतदार संघाचे प्रतिनिधत्व करणारे लोकसभा, विधानसभा व विधानपरिषदेचे विद्यमान व माजी सदस्य (MP/MLA/MLC) (एकूण आरक्षण २ %)** | अर्जदार कोणत्या मतदार संघातून निवडून आला आणि कोणत्या वर्षी निवडून आला आहे / होता ते प्रमाणित करणारे आवश्यक प्रमाणपत्र संबंधित संसद/विधानसभा/विधानपरिषद सचिवालयाच्या सचिवाने दिलेले असावे. तसेच अर्जदारास खालील अटी लागू राहतील.<br>१. महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी एक सदनिका किंवा भूखंड प्राप्त करु शकेल.<br>२. ज्या ठिकाणी, अर्जदार, प्राधिकरणाने बांधलेली सदनिका किंवा भूखंड प्राप्त करु इच्छित असेल त्या ठिकाणी एखादी सदनिका किंवा भूखंड मालकी तत्वावर किंवा भाडेखरेदी तत्वावर अथवा भाडे तत्वावर त्याच्या/तिच्या कब्ज्यामध्ये नसावा.<br>३. शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून, मिळवलेली एखादी सदनिका अथवा निवसी भूखंड भाडे तत्वावर अथवा लिव्ह ॲण्ड लायसन्सच्या तत्वावर अगोदरच त्यांच्या/तिच्या कब्जात असेल तर त्याने / तिने अशी सदनिका / निवासी भूखंड शासनाकडे किंवा प्रकरण परत्वे प्राधिकरणाकडे परत केली पाहिजे / केले पाहिजे.<br>गाळयासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने वरील सर्व शर्ती पूर्ण केल्या याची खात्री पटवून देण्याकरीता उपनिर्दिष्ट सर्व शर्ती पूर्ण केल्याच्या पुष्ठयर्थ त्यांनी प्रतिज्ञालेख केला पाहिजे. |
| **म्हाडा कर्मचारी (ME) (एकूण आरक्षण २ %)** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचवारी ज्यांची म्हाडामध्ये सलग कायम आस्थपनेवर ०५ वर्ष सेवा झाली आहे असे अर्जदार या सवंर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी व त्याचप्रमाणे शिकाऊ उमेदवार, तात्पुरती भरती केलेला नोकरवर्ग आणि ज्यांना महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही यापूर्वी या आरक्षणाखाली जमा मिळालेली आहे व त्याच प्रमाणे कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या |

| | |
|---|---|
| | संस्थाचे जे सदस्य आहेत तसेच ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने मालकीतत्वावर देण्यात आली आहेत त्यांना या प्रवर्गामध्ये गाळयासाठी अर्ज करता येणार नाही. वरीलप्रमाणे निकषाची पूर्तता करणारे म्हाडा कर्मचारी असल्याचे सचिव/प्रा. यांचे प्रमाणपत्र पात्रतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. |
| **राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळ, महामंडळे इ. चे कर्मचारी तसेच अगोदर निवृत्त झालेले कर्मचारी (SG) (एकूण आरक्षण ५ %)** | राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील संविधानिक मंडळे, महामंडळाचे कर्मचारी ज्यांची कायम आस्थपनेवर कमीत कमी ०५ वर्ष सेवा झाली आहे असे अर्जदार या संवर्गात सदनिका मिळण्यासाठी पात्र ठरतील. या प्रवर्गात महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हापरिषद तसेच अनुदानित / विनाअनुदानित शैक्षणिक संस्था यांचे कर्मचारी हे स्थानिक स्वराज्य संस्थाचे कर्मचारी असल्यामूळे या आरक्षित गटांकरिता अर्ज करण्यास पात्र नाहीत. तसेच म्हाडा कर्मचारी या प्रवर्गासाठी अर्ज करण्यासाठी पात्र नसतील. असे कर्मचारी / निवृत्त कर्मचारी यांना त्यांच्या खात्याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| **शासकीय निवासस्थानात राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र शासनाचे कर्मचारी (CG) (एकूण आरक्षण २ %)** | अ. या प्रवर्गातील अर्जदाराला, त्यांच्या संबधित अधिकाऱ्यांकडून तो ३ वर्षाच्या कालावधीत सेवानिवृत्त होणार असल्याचे आणि तो कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील सेवा निवासस्थानात राहत असल्याचे प्रमाणपत्र मिळवावे लागेल व सोडतीत यशस्वी झाल्यानंतर प्रमाणपत्र सादर करावे लागेल. जे अगोदर निवृत्त झाले असतील त्यांना देखील या प्रवर्गाचा लाभ घेता येईल. जाहिरात प्रसिध्द झाल्याचा दिनांक हा सेवानिवृत्तीच्या पूर्वीचा ३ वर्षाचा कालावधी ग्राहय धरला जाईल.<br>ब. **नियत वयोमान झाल्यानंतर ३ वर्षामध्ये निवृत्त होणाऱ्या व्यक्तींकरिताच केवळ ही सवलत आहे. स्वेच्छेने निवृत्त झालेल्या केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी हया प्रवर्गाचा लाभ घेता येणार नाही.**<br>क. ३ वर्षामध्ये निवृत्त होणारे जे कर्मचारी महाराष्ट्र राज्यातील त्यांना वितरीत केलेल्या शासकीय निवासस्थानात राहत नाहीत अशा कर्मचाऱ्यांना या आरक्षित गटाचा लाभ घेता येणार नाही.<br>ड. जे अर्जदार ३ वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत व ते महाराष्ट्रामध्ये सेवेत आहेत अशा केंद्रीय कर्मचाऱ्यांनाच हयाचा लाभ घेता येईल. त्याकरीता अधिवास प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| | चित्रपट / दुरदर्शन / नाटक / तमाशा/ आकाशवाणी / चित्रकार / मुर्तिकार क्राफ्टमन / संगितकार/ नृत्य इ. क्षेत्रातील कलाकार व्यक्ती संपूर्णपणे कलादर्शनातून व कला व्यवसायातून होणाऱ्या प्राप्तीवर निर्भर असून त्यावरच प्रामुख्याने त्याची उपजिवीका अवलंबून आहे व जी व्यक्ती कलेची साधना गेली १५ वर्षे करीत आहे. अशाच व्यक्ती कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. उपजिविकेकरीता |

| | |
|---|---|
| **कलाकार (AR)<br>(एकूण आरक्षण २ %)** | इतर व्यवसायावर अवलंबून असून फावल्या वेळी कलेची उपासना, छंद व व्यासंग म्हणून कलेची जोपासना करणारी व्यक्ती या प्रवर्गासाठी पात्र नाही. **कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय किंवा महाराष्ट्र राज्य कला संचालनालय कडून आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.** केवळ एखाद्या शिक्षण संस्थेत किंवा महाविद्यालयात कलेच्या क्षेत्रता मिळविलेली पदवी अर्जदारास कलाकार म्हणून मान्यता देण्यास पुरेशी नाही असे स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे. |
| **सर्वसाधारण जनता (GP)<br>(एकूण आरक्षण ५० %)<br>उर्वरीत** | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८१ मधील नियम १३ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ मधील नियम १६ मध्ये अंतर्भूत असलेले आरक्षित गट / प्रवर्ग वगळून प्रस्तृत योजनेतील ५० % सदनिका या सर्वसाधारण जनतेसाठी उपलब्ध असतील. |

**मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी कोणतेही कारण न देता, या गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे किंवा सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत**

**माहितीपुस्तिकेतील अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकीचा फायदा अर्जदारास घेता येणार नाही.**

**मुख्य अधिकारी**
**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**औरंगाबाद.**

## <u>सावधानतेचा इशारा :</u>

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी / सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला औरंगाबाद मंडळ / म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल / व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा म्हाडाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास म्हाडाच्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण, तसेच मिळकत व्यवस्थापक / औरंगबाद मंडळ यांचे कार्यालयास कळवावे, त्यांचे दुरध्वनी पुढीलप्रमाणे आहेत.

मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांचे दुरध्वनी क्रं. : ०२२-६६४०५४४८

मिळकत व्यवस्थापक / औरंगाबाद मंडळ : ०२४०-२३३४०३५

अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक :- ९८६९९८८०००

ई-मेल- :- emaurmhada@gmail.com

**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**

**परिशिष्ठ**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जागेची विक्री विनियम १९८१ मधील नियमानुसार निरनिराळया प्रवर्गासाठी संकेतनिहाय प्रवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या सदनिकांची संख्या दर्शविणारा तक्ता)**

| आरक्षण प्रवर्गाचा तपशिल | संकेत क्र. ११३ | संकेत क्र. ११४ | संकेत क्र. ११५ | संकेत क्र. ११६ | संकेत क्र. ११७ | संकेत क्र. ११८ | संकेत क्र. ११९ | संकेत क्र. १२० | संकेत क्र. १२१ | संकेत क्र. १२२ | संकेत क्र. १२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती आणि नवबौध्द | ४० | १५ | ०१ | ०१ | ०३ | ०७ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | १८ |
| अनुसूचित जमाती | २२ | ०८ | ० | ०१ | ०२ | ०४ | ०१ | ० | ० | ०३ | १० |
| भटक्या जमाती | ०६ | ०२ | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| विमुक्त जमाती | ०६ | ०२ | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| पत्रकार | ०९ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०४ |
| स्वातंत्र्य सैनिक | ०९ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०४ |
| शारिरीक दृष्टया अपंग | ११ | ०४ | ० | ० | ०१ | ०२ | ० | ० | ० | ०१ | ०५ |
| संरक्षण दलातीलकिंवा सीमा सुरक्षा दलातील जे कर्मचारी तसेच कोणत्याही लढाईत जे जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | ०७ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती | १८ | ०७ | ० | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ० | ०२ | ०८ |
| महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे, विधानसभेचे व विधानपरिषेदेचे आजी - माजी सदस्य | ०७ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| म्हाडा कर्मचारी | ०७ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इत्यादीचे कर्मचारी यात यापुर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. | १८ | ०७ | ० | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ० | ०१ | ०१ | ०८ |
| शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवा निवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी | ०७ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| चित्रपट, दुरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफार्मिंग आटसशी संबंधित असलेले कलाकार यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, व नकलाकार यांचा समावेश आहे. | ०७ | ०३ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०३ |
| सर्वसाधारण जनता | १९४ | ६६ | ०६ | ०८ | १३ | ३२ | ११ | २१ | ० | २६ | ९० |
| एकूण सदनिका | ३६८ | १३२ | ०७ | १२ | २८ | ६० | १६ | २३ | ०२ | ४८ | १६८ |

## ऑनलाईन नोंदणी सिस्टीम मध्ये आपले स्वागत आहे.

**ऑनलाईन फॉर्म भरताना खालील ३ बाबी लक्षात घ्याव्यात.**

अ. **नोंदणी:** नविन अर्जदार ज्याला म्हाडाच्या सोडत २०२१ चा ऑनलाईन फॉर्म भरावयाचा आहे, त्यास प्रथमत नोंदणी करताना अर्जदाराने त्याची प्राथमिक माहिती उदा. अर्जदाराचे नाव, पॅनकार्ड क्रमांक, आधार कार्ड क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, व्हाटस ॲप क्रमांक, पासपोर्ट आकाराचा फोटो बँक अकाऊंट क्रमांक (रिफंडसाठी) इत्यादी आवश्यक आहे.

ब. **ऑनलाईन अर्ज भरणे :** नोंदणीकृत अर्जदार त्याची माहिती उदा. उत्पन्न प्रवर्ग, आरक्षण प्रवर्ग इत्यादी बाबी भरुन ऑनलाईन फॉर्म भरु शकतो. अर्जदार ऑनलाईन अर्जामध्ये योजनेची विस्तृत माहिती पाहू शकतो व त्यास पाहिजे ती योजना निवडू शकतो, जी सोडतीमध्ये उपलब्ध आहे. अर्जदाराला योजनेसाठी स्वतंत्र फॉर्म भरावा लागेल.

क. **अनामत रक्कम भरणे :** अर्जदारास RTGS / NEFT, Net Banking, Credit Card, Debit Card द्वारे भरता येईल.

१. माहिती पुस्तिकेत असल्याप्रमाणे अर्जदाराने आपले मासिक उत्पन्न बरोबर भरले आहे. याची अर्जदाराने खात्री करावी. त्याच्या मासिक उत्पन्नानुसार अर्जदाराचे उत्पन्न प्रवर्ग निश्चित केले जाते.

२. आपल्याकडे उपल्बध असलेलाच भ्रमणध्वनी क्रमांक द्यावा कारण यापुढील अर्जदारास आवश्यक ते संपर्क इत्यादी SMS द्वारेच देण्यात येतील.

३. अर्जदाराने खात्री करावी की त्याने त्याचा ई-मेल आयडी बरोबर दिला आहे. कारण यापुढील अर्जदाराबरोबरचे संपर्क ई-मेल द्वारेही होईल.

४. अर्जदारास त्याचा आधार कार्ड क्रमांक देणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन अर्जामध्ये ज्या बाबी ***"*"***अशा पध्दतीने दर्शविलेल्या आहेत. त्या भरणे अनिवार्य आहे.

# MHADA-HELP FILE

## Help File for FOR Fillup the form

## Help File

# MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,

### (विभागीय मंडळ-औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ)